11 JUN 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्तीविषयक जागृतीसाठी युवकांनी प्रयत्न करावेत

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन; 'आव्हान-२०१७'चा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नदीकाठालाघरेबांधूनउंचटोलेजंग इमारती उभारून आपण विकासाच्या नावाखाली नव-नवीन आपत्ती निर्माण करीत आहोत. लोकसंख्या वाढ व नदी, नाले मुजविल्याने गावा-गावांतील आपत्तीत वाढ झाली आहे. 'आव्हान' प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षित झालेल्या युवकांनी आपापल्या जिल्ह्यांतील गावागावांतून, शाळा-महाविद्यालयांतून आपत्ती व्यवस्थापनविषयक जागृतीसाठी कार्यरत राहावे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी शाहू महाराज छत्रपती, महापौर हसिना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) निरीक्षक एस.डी. इंगळे उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, दुर्घटना होऊ नये, यासाठी दक्षता बाळगणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहे. आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे महत्त्वाचे आहे. 'आव्हान' हा कुलपती कार्यालयाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या चॅन्सलर्स ब्रिगेडच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांला आता आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ मिळणार आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रशिक्षणाचा उपयोग परिसरातील अन्य युवकांना करून द्यायला हवा.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोप समारंभात बोलताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. डॉ. कुणाल खेमनार, प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, महापौर हसिना फरास, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शाहू महाराज छत्रपती, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, डॉ. डी. टी. शिर्के, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू आतार)

### 'आव्हान'मध्ये पुणे, सातारा जिल्हा सर्वोत्कृष्ट

'आव्हान-२०१७'मध्ये प्रशिक्षणात पुणे व सातारा जिल्ह्याचे संघ अनुक्रमे सर्वोत्कृष्ट ठरले. त्यांना 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक प्रदान करण्यात आला. 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट लिडर' साठीचा फिरता चषक नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्रा. अतुल अकोठोर व पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रा. सारिका पेरणे यांना देण्यात आला. 'बेस्ट एनएसएस व्हॉलंटिअर'साठीचा फिरता चषक चौघांना देण्यात आला. यामध्ये महेश गणेश बन (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), कुणाल मानकर (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), हर्षा सुनील भट्ट (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) आणि सामिका सावंत (बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली) यांचा समावेश आहे. जनजागृती फेरीमधील सर्वोत्कृष्ट सहभागासाठीचा फिरता चषक मुंबई विद्यापीठाने पटकाविला.

यावेळी मंत्री पाटील यांनी देशाच्या आपत्ती व्यवस्थापनात अत्यंत मोलाचे योगदान देणाऱ्या एन.डी.आर.एफ.च्या जवानांचीही प्रशंसा केली.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, आपत्ती व्यवस्थापनात तत्काळ मदत, त्यानंतर निवारा व अन्य मदत आणि त्यानंतर पुनर्वसन हे तीन घटक महत्त्वाचे असतात. यापैकी तत्काळ मदत देण्यात आपण कमी पडतो. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनांतर्गत १२९ गावांत पूरस्थिती येण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानिक २५ ते ५० वयोगटांतील नागरिकांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम जिल्हा प्रशासनाने हाती घेतला आहे. त्यापैकी ५० गावांतील नागरिकांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भाषणात आपत्तीप्रसंगी विद्यापीठ परिक्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजनेतून दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या 'माध्यमविद्या' या विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले. शुक्रवारी शहरातून काढलेल्या जागृती फेरीदरम्यान सोलापूर विद्यापीठाची स्वयंसेवक विद्या कदम हिने आपत्ती निधी गोळा केला. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे यांनी तो जिल्हाधिकारी सुभेदार यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी 'आव्हान-२०१७' चे अहवाल वाचन केले. डॉ. तृप्ती करेकट्टी आणि नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांनी राष्ट्राला मदतीसाठी तत्पर असावे

राज्यपाल सी. विद्यासागर राव काही अपरिहार्य कारणामुळे आजच्या समारोप समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी शिबिरार्थींना विशेष शुभसंदेश पाठवून प्रोत्साहित केले. शिबिराचे यजमानपद यशस्वीरीत्या भूषविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे अभिनंदन केले. चॅन्सलर्स ब्रिगेडच्या भेटीसाठी उपस्थित राहू न शकल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. आव्हान व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रला त्यांच्या सेवेची गरज भासेल, तेव्हा ती बजावण्यासाठी तत्पर असावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

11 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनिर्बंध विकास देशाच्या विकासासाठी मारक

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन , शिवाजी विद्यापीठात दहा दिवस सुरू असलेल्या 'आव्हान २०१७' चा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

बदलती जीवन शैली, वाढते नागरीकरण यामुळे आपण अनिर्बंध विकास करून आपत्तीकडे वाटचाल करीत आहोत. यापुढे नियोजनबध्द विकास करणे काळाची गरज असून अनिर्बंध विकास देशाच्या विकासासाठी मारक असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात गेली दहा दिवस सुरू असलेल्या 'आव्हान२०१७' च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे प्रायोगिक 'माध्यमविद्या' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. शुक्रवारी काढलेल्या रॅली दरम्यान सोलापूर विद्यापीठाने गोळा केलेला आपत्ती व्यवस्थापन निधी जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला. सोलापूर विद्यापीठाचे कौतुक करीत श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी निधी स्वरूपात काही रक्कम दानपेटीत टाकली. 'आव्हान–२०१७'मध्ये प्रशिक्षणात पुणे व सातारा जिल्ह्याचे संघ सर्वोत्कृष्ट ठरले. त्यांना 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक प्रदान करण्यात आला. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी ऑनलाईन शुभेच्छा दिल्या.

पालकमंत्री पाटील म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन हे जिकरीचे व लोकसेवेचे कार्य आहे. मनुष्य व नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यानंतर यातून मार्ग कसा काढायचा यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ वाढवण्याची गरज आहे. दुर्घटना होऊ नये, यासाठी दक्षता बाळगणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहेच, पण त्याच्या इतकेच आपत्तीच्या क्षणी आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे महत्त्वाचे आहे. हे मनुष्यबळ 'आव्हान'मधील चॅन्सलर्स ब्रिगेडच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात उपलब्ध होणार आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रशिक्षणाचा उपयोग आपल्या परिसरातील अन्य युवकांना करून द्यायला हवा, जेणे करून त्यांनाही आपत्तीच्या प्रसंगी कशा प्रकारे निर्णय घ्यावेत किंवा आपद्ग्रस्तांना सुरक्षितपणे कशी मदत करता येईल, याची माहिती होईल. मंत्री पाटील यांनी आपल्या कारकीर्दीत २ ऑगस्ट २०१६ रोजी रायगड जिल्ह्यात पूर आल्याने सावित्री नदीवरचा पूल कोसळला. या पुलाचे बांधकाम १६५ दिवसात केले. तसेच माळीण येथील दुर्घटनेनंतर गावाचे पुनर्वसनही केल्याचे सांगितले. व्हाईट आर्मी आणि एनडीआरएफच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आव्हान२०१७' च्या समारोप प्रशिक्षणात पुणे व साताऱ्याचे संघ सर्वोत्कृष्ट ठरले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील व श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक स्वीकारताना पुणे संघ. सोबत डावीकडून डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, महापौर हसीना फरास, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी आदी. दुसऱ्या छायाचित्रात साताऱ्याचा संघ.

यावेळी महापौर हसीना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे निरीक्षक एस.डी. इंगळे उपस्थित होते.

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाचे धडे देण्याची गरज

नैसर्गिक व मानवी आपत्ती आल्यानंतर उपाय–योजना केल्या जातात. मात्र जेथे आपत्ती ओढवली आहे, येथे मिळालेल्या प्रशिक्षणाचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्यात होतो. म्हणून विद्यापीठ पातळीबरोबर प्रत्येक महाविद्यालयात जाऊन आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्याची गरज आहे.

### पारितोषिक मिळवलेली विद्यापीठ

'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट लीडर'साठीचा फिरता चषक नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्रा. अतुल अकोठोर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रा. सारिका पेरणे यांना देण्यात आला. 'बेस्ट एनएसएस' चा चषक महेश बन ( आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), कुणाल मानकर (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), हर्षा भट्ट (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) आणि सामिका सावंत (बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली) यांचा समावेश आहे. जनजागृती फेरीमधील सर्वोत्कृष्ट सहभागासाठीचा फिरता चषक मुंबई विद्यापीठाने पटकावला.

11 JUN 2017

महाराष्ट्र टाईम्स

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आपत्ती व्यवस्थापनची गावागावांत जागृती करा'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'आव्हान' प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षित झालेल्या युवकांनी गावागावांत जाऊन, आपत्ती व्यवस्थापनविषयक जागृती करावी, असे आवाहन महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील 'आव्हान-२०१७' या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, महापौर हसीना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार, आयुक्त अभिजीत चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) निरीक्षक एस. डी. इंगळे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांनी विद्यार्थ्यांना जिल्हा पातळीवरील आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने माहिती दिली.

'आव्हान-२०१७'च्या निमित्ताने शहरातून काढण्यात आलेल्या जागृती फेरीदरम्यान सोलापूर विद्यापीठाची स्वयंसेवक विद्या कदम हिने आपत्ती निधी गोळा केला. त्यात श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनीही उत्स्फूर्तपणे आपल्याकडील पैसे या निधीला दिले. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे यांनी हा निधी जिल्हाधिकारी सुभेदार यांच्याकडे सुपूर्द केला.

## पुणे व सातारा जिल्हा सर्वोत्कृष्ट

'आव्हान-२०१७'मध्ये प्रशिक्षणात पुणे व सातारा जिल्ह्याचे संघ अनुक्रमे सर्वोत्कृष्ट ठरले. त्यांना 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक प्रदान करण्यात आला. 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट लीडर'साठीचा फिरता चषक नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्रा. अतुल अकोठोर आणि पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रा. सारिका पेरणे यांना देण्यात आला. 'बेस्ट एनएसएस व्हॉलंटिअर'साठीचा फिरता चषक चौघांना देण्यात आला. यामध्ये महेश गणेश बन (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), कुणाल मानकर (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), हर्षा सुनिल भट्ट (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) आणि सामिका सावंत (बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली) यांचा समावेश आहे. जनजागृती फेरीमधील सर्वोत्कृष्ट सहभागासाठीचा फिरता चषक मुंबई विद्यापीठाने पटकावला.




'आव्हान-२०१७'मध्ये प्रशिक्षणात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या पुणे जिल्हा संघाला मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2017
लोकसत्ता

# 'आव्हान'च्या युवकांनी आपत्ती व्यवस्थापन जागृती करावी

## चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

प्रतिनिधी , कोल्हापूर

**'आव्हान' प्रशिक्षणांतर्गत** प्रशिक्षित झालेल्या युवकांनी आपापल्या जिल्ह्यांतील गावागावांतून, शाळा-महाविद्यालयांतून आपत्ती व्यवस्थापनविषयक जागृतीसाठी कार्यरत राहावे, असे आवाहन महसूल, आपत्ती व्यवस्थापन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठात गेल्या १ जूनपासून सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी पाटील म्हणाले, दुर्घटना होऊ नये यासाठी दक्षता बाळगणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहेच, पण त्याच्याइतकेच आपत्तीच्या क्षणी आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे हेही महत्त्वाचे आहे. 'आव्हान' हा कुलपती कार्यालयाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या चॅन्सलर्स ब्रिगेडच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला आता आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. देशाच्या आपत्ती व्यवस्थापनात अत्यंत मोलाचे योगदान देणाऱ्या एनडीआरएफच्या जवानांचीही त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांनी विद्यार्थ्यांना जिल्हापातळीवरील आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने माहिती दिली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आपल्या भाषणात आपत्तीप्रसंगी विद्यापीठ परिक्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या योगदानाविषयी माहिती दिली.

### राज्यपाल अनुपस्थित

राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार होता, पण ते अनुपस्थित राहिले. विद्यासागर राव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन या वेळी करण्यात आले. शेतकरी संपाच्या अनुरोधाने किसान सभेने निदर्शने करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे राज्यपालांनी कोल्हापूरला येणे टाळले, असे संयोजक गिरीश फोंडे यांनी सांगितले.

'1 1 JUN 2017
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवनिर्मित आपत्ती कमी होण्याची गरज : पालकमंत्री

## विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : नद्या व नाल्यांकाठी इमारती बांधल्याने मानवनिर्मित आपत्ती निर्माण होत आहे. विकासाकडे पाऊल टाकताना निरनिराळ्या आपत्तींच्या दिशेने होणारी वाटचाल धोकादायक आहे. त्यामुळे मानवनिर्मित आपत्ती कमीत कमी होऊन विकास घडावा, अशी अपेक्षा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात एक जूनपासून सुरू असलेल्या आव्हान राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, महापौर हसीना फरास प्रमुख म्हणून उपस्थित होते. शिबिराचा लोककला केंद्रात समारोप झाला.

श्री. पाटील म्हणाले, ''शिबिरातून प्रत्येक जिल्ह्यात तीस जणांचा आपत्ती व्यवस्थापनासाठीचा गट तयार होत आहे. या गटाने आता महाविद्यालयांवर जाऊन आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे. दुर्घटना होऊ नये, यासाठी दक्षता बाळगणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहेच; पण त्याच्याइतकेच आपत्तीच्या क्षणी आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे हेही महत्त्वाचे आहे. चॅन्सलर्स ब्रिगेडच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला आता आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल.'' त्यांनी गतवर्षी रायगड जिल्ह्यातील सावित्री नदीवरील पूल कोसळून झालेली दुर्घटना आणि त्यानंतरच्या कालखंडातील बचाव व मदत कार्य, माळीण दुर्घटनेनंतर झालेले गावाच्या पुनर्वसनाचे कार्य, ठाणे येथील इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतून पाच शालेय विद्यार्थ्यांना तासानंतरही वाचविण्यात आलेले यश, असे प्रसंग सांगून आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व शिबिरार्थींना सांगितले. देशाच्या आपत्ती व्यवस्थापनात मोलाचे योगदान देणाऱ्या एन. डी. आर. एफ.च्या जवानांचीही त्यांनी प्रशंसा केली. जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, ''जिल्ह्यात येणाऱ्या महापुराच्या आपत्तीचा आढावा घेत सर्व विभाग सज्ज आहेत. ज्या गावात

पान २ वर »



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित आव्हान - २०१७ शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील. शेजारी डावीकडून मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, महापौर हसीना फरास, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनडीआरएफचे निरीक्षक एस. डी. इंगळे.** (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

### पुणे व सातारा जिल्हा सर्वोत्कृष्ट

**शिबिरात पुणे व सातारा जिल्ह्यांचे संघ सर्वोत्कृष्ट ठरले. त्यांना उत्कृष्ट कॉन्टिंजेन्ट फिरता चषक देण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्रा. अतुल अकोठोर व पुण्याच्या सावित्रीबाई फुले, विद्यापीठाच्या प्रा. सारिका पेरणे यांना उत्कृष्ट कॉन्टिंजेन्ट लीडर, तर महेश गणेश बन (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), कुणाल मानकर (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), हर्षा सुनील भट्ट (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) व समिका सावंत (बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली) यांना उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराने गौरविले. जनजागृती फेरीमधील सर्वोत्कृष्ट सहभागासाठीचा फिरता चषक मुंबईने पटकावला.**

11 JUN 2017
सकाळ

जनसंपर्क कक्ष'
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवनिर्मित आपत्ती कमी होण्याची गरज : पालकमंत्री

» पान १ वरून

महापूर येतो त्या १२९ गावांतील २५ ते ५० वयोगटांतील ग्रामस्थांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले आहे. व्हाईट आर्मी व जीवनज्योतीतर्फे पन्नास गावांत प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. आपत्ती आल्यानंतर आपत्तीत अडकलेल्यांना तत्काळ मदतीसाठी आपण कमी पडतो. रिलीफ व रिहॅबिलिटेशनमध्ये आपले काम चांगले आहे.''

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''विद्यापीठ एनएसएसच्या माध्यमातून एक व्यक्ती एक पेंडी, एक मूठ धान्य असे उपक्रम राबवून गतवर्षी दुष्काळग्रस्त भागातील नागरिक व जनावरे यांना दिलासा देण्याचे काम करण्यात आले. त्याचप्रमाणे शेततळी, छोटे बंधारे यांच्या बांधकामात श्रमदान केले.'' या वेळी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या 'माध्यमविद्या' विशेषांकाचे प्रकाशन झाले.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित आव्हान - २०१७ शिबिराच्या समारोप प्रसंगी उपस्थित अधिकारी, प्राध्यापक, स्वयंसेवक, विद्यार्थी.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) निरीक्षक एस. डी. इंगळे उपस्थित होते.

यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राज्यपाल तथा कुलपती श्री. विद्यासागर राव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी आव्हान शिबिराचा आढावा घेतला. डॉ. तृप्ती करेकट्टी आणि नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

आपत्ती व्यवस्थापनाच्या जनजागृती फेरीदरम्यान सोलापूर विद्यापीठाची स्वयंसेवक विद्या कदम हिने निधी गोळा केला. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे व विद्या यांनी तो जिल्हाधिकारी श्री. सुभेदार यांच्याकडे सुपूर्द केला.

11 JUN 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंसेवकांनी आपत्ती व्यवस्थापन जागृती करावी

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील : 'आव्हान-२०१७' शिबिराचा समारोप




कोल्हापूर : 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक मिळविलेला पुणे आणि सातारा जिल्हा संघ. (छाया : एस. अली)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

'आव्हान' प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षित झालेल्या युवकांनी गावागावांतून, शाळा-महाविद्यालयांतून आपत्ती व्यवस्थापनविषयक जागृतीसाठी कार्यरत राहावे, असे आवाहन राज्याचे महसूल, मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापनमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात १ जूनपासून सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री पाटील म्हणाले, दुर्घटना होऊ नये, यासाठी दक्षता बाळगणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहेच; पण त्याच्याइतकेच आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे हेही महत्त्वाचे आहे. या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणाचा उपयोग परिसरातील अन्य युवकांना करून द्यायला हवा, जेणेकरून त्यांनाही आपत्तीच्या प्रसंगी कशा प्रकारे निर्णय घ्यावेत किंवा आपद्ग्रस्तांना सुरक्षितपणे कशी मदत करता येईल, याची माहिती होईल.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, आपत्ती व्यवस्थापनात तत्काळ मदत, त्यानंतर निवारा व अन्य मदत आणि त्यानंतर पुनर्वसन हे तीन घटक महत्त्वाचे असतात. यापैकी पहिल्या तत्काळ मदतीच्या प्रसंगी 'आव्हान'सारख्या शिबिरांतून देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा मोठा वाटा आहे. कोल्हापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापनांतर्गत १२९ गावांत पूरस्थिती येण्याची शक्यता लक्षात घेऊन तेथील स्थानिक २५ ते ५० वयोगटातील नागरिकांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम जिल्हा प्रशासनाने हाती घेतला आहे. त्यापैकी ५० गावांतील नागरिकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आपत्तीप्रसंगी विद्यापीठ परिक्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. विद्यापीठ एनएसएसच्या माध्यमातून 'एक व्यक्ती, एक पेंढी', 'एक मूठ धान्य' असे उपक्रम राबवून गतवर्षी दुष्काळग्रस्त भागातील नागरिक व जनावरे यांना दिलासा देण्याचे काम करण्यात आले. त्याचप्रमाणे शेततळी, छोटे बंधारे यांच्या बांधकामात श्रमदानातून योगदान देत असल्याचेही सांगितले.

या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या 'माध्यमविद्या' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. शुक्रवारी शहरातून काढण्यात आलेल्या जागृती फेरीदरम्यान सोलापूर विद्यापीठाची स्वयंसेवक विद्या कदम हिने आपत्ती निधी गोळा केला. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे यांनी तो जिल्हाधिकारी सुभेदार यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'आव्हान-२०१७'मधील विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी 'आव्हान-२०१७'चे अहवाल वाचन केले. डॉ. तृप्ती करेकट्टी आणि नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

महापौर हसीना फरास, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) निरीक्षक एस. डी. इंगळे उपस्थित होते.

### पुणे व सातारा जिल्हा संघ सर्वोत्कृष्ट

पुणे व सातारा जिल्ह्याचे संघ सर्वोत्कृष्ट ठरले. त्यांना 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक प्रदान करण्यात आला. 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट लीडर'साठीचा फिरता चषक नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्रा. अतुल अकोठोर आणि पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रा. सारिका पेरणे यांना देण्यात आला. 'बेस्ट एनएसएस व्हॉलंटिअर'साठीचा फिरता चषक चौघांना देण्यात आला. यामध्ये महेश गणेश बन (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), कुणाल मानकर (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), हर्षा सुनील भट्ट (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) आणि सामिका सावंत (बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली) यांचा समावेश आहे. जनजागृती फेरीमधील सर्वोत्कृष्ट सहभागासाठीचा फिरता चषक मुंबई विद्यापीठाने पटकावला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2017
Times of India

# 10-day NSS camp concludes

**Kolhapur:** A state-level National Service Scheme (NSS) disaster management training camp 'Avhaan' concluded on Saturday. Over 1,200 students from across the state participated in the camp.

The 10-day long camp was concluded in the presence of the guardian minister Chandrakant Patil. During the concluding ceremony Patil said, "The volunteers must use their disaster management skills and spread the word among their school and college going friends."

"A skilled set of volunteers are important to handle any kind of disaster. Avhaan is one of the most important programs under the Chancellor's office that gives us trained volunteers every year," he added.

During his speech, Patil reminded participants about the last year's bridge collapse on Savitri river in Raigad district. He appreciated the disaster management team efforts to handle such crisis with proficiency.

Avinash Subhedar district collector said, "The Kolhapur district has around 129 villages which are prone to the flood. Training locals between the age group of 20-30 years will be useful."

Vice-chancellor of SUK Devanand Shinde said, "NSS has been quite helpful because of their range of social activities in the recent past." TNN